Estd. 1962
NAAC "A" Grade
MHRD-NIRF-28th Rank

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA**
PHONE :EPABX-2690571(10 lines), 2693643(9 lines), 2693730 (9 lines)
FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र**
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2690571 (दहा लाईन्स), पात्रता विभाग दुरध्वनी 0231–2609137 / 38

---

जा.क्र.शिवाजी वि. / पात्रता / डी.के. / 202 दि. 30 JAN 2017

अत्यंत महत्वाचे व तातडीचे

1. मा. प्राचार्य / संचालक,
   सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुख / संचालक / समन्वयक,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रतेच्या पुर्ततेबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे जा.क.52 दि.2 / 7 / 2016 रोजीचे पत्र.**

**महोदय,**

उपरोक्त विषय संदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमाच्या पात्रतेचे कामकाज करत असताना असे निदर्शनास आले आहे की, विविध महाविद्यालये / अधिविभाग पात्रता फॉर्म वेळेत सादर करत नाहीत. तसेच पात्रता फॉर्म सोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडली जात नाहीत. त्यामुळे अपूर्ण कागदपत्रांमुळे व पात्रता अर्ज जमा न केल्यामुळे पात्रता अपूर्ण राहतात. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित ठेवावे लागतात. तसेच ज्या त्या वर्षी पात्रतेच्या त्रुटी कळवूनही त्याची पूर्तता केली जात नाही.

शैक्षणिक वर्ष 2016–17 मधील विविध कोर्सचे ज्यांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे त्यांच्या पात्रता विद्यापीठाच्या पोर्टलवर ऑनलाईन (Confirm) पूर्ण केलेल्या आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे अपूर्ण आहेत त्यांच्या त्रुटी विद्यापीठाच्या पोर्टलवर ऑनलाईन कळविलेल्या आहेत. त्या पाहून कागदपत्रांची पुर्तता तात्काळ करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष 2015–16 व त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्षामधील विविध कोर्सची पात्रता ऑनलाईन / मॅन्युअली करुन आपणास कळविले आहे. तसेच ज्यांची त्रुटी आहेत त्या ही ऑनलाईन / मॅन्युअली कळविलेल्या आहेत. तथापी अद्याप कांही विद्यार्थ्यांच्या त्रुटींची पुर्तता ब–याच महाविद्यालयानी केलेली नाही. तरी सदर त्रुटी पाहून 15 दिवसात आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात यावी.

ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण आहे अशा विद्यार्थ्यांना चौकशीसाठी अथवा कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी परस्पर विद्यापीठात पाठवू नये. तसेच विद्यार्थ्यांच्या पात्रता अपूर्ण या कारणास्तव कांही अडचणी उदभवलेस याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय व अधिविभाग यांची राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

कुलसचिव